यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जावक क्र. परीक्षा/पनिका/२०२६ 2132

दिनांक : १६/१०/२०२६

परिपत्रक

विषय : सन २०२६ च्या खरीप हंगामातील महाराष्ट्र राज्यातील विविध तालुक्यांतील दुष्काळ जाहीर झालेल्या भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणे करणेबाबत.

संदर्भ :

१. **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८/१०/१९९३.**
२. **मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती २६/प्र. क्र. ८२/मदत/२, दि. २५/०९/२०२६.**
३. **उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. उशिंस/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६, दि. ३०/०९/२०२६.**
४. **मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्रमांक: समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२ दि. १४ ऑक्टोबर २०२६**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय व उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या निर्देशानुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामात महाराष्ट्र राज्यातील विविध तालुक्यांमध्ये **मदत व पुनर्वसन विभागाने निर्गमित केलेल्या विविध शासन निर्णयाद्वारे** दुष्काळ घोषित करण्यात आला असून, संबंधित भागांतील नागरिकांना विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने, दुष्काळसदृश घोषित तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीची सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

त्यास अनुसरून, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्रे, अभ्यासकेंद्रे व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित नियमित (Regular/Fresher) विद्यार्थ्यांचे परीक्षेचे शुल्क प्रवेश शुल्कासमवेत विद्यापीठाकडून ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र. ३ व ४ अन्वये प्राप्त निर्देशांच्या अनुषंगाने, दुष्काळसदृश घोषित तालुक्यांतील परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे शुल्क माफ करण्यासाठी विद्यापीठामार्फत धोरण निश्चित करण्यात आले आहे. परीक्षा शुल्काचा परतावा प्राप्त करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज आणि आवश्यक सहपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यात उत्पन्नाचा दाखला आणि बँकेचे तपशील इत्यादी कागदपत्रे सादर करावे. याबाबतचे सविस्तर परीपत्रक निर्गमित करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव(प्र)

परीक्षा नियंत्रक